# पणदूर महाविद्यालयात कॅम्पस इंटरव्ह्यू: एक सुवर्णसंधी

**पणदूर:** पदवी, पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण किंवा शेवटच्या वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना **जस्ट डायल लि. मुंबई** या आयटी कंपनीला गोवा व सिंधुदुर्ग या ठिकाणी किमान ५० उमेदवार नियुक्त करावयाचे आहेत. यासाठी कोणत्याही शाखेचा पदवीधर किंवा पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांनी मुलाखतीसाठी उपस्थित राहावे. सदरच्या इंटरनेट टेक्नॉलॉजी कंपनीमध्ये किमान २ लाख ते तीन लाख रु. चे पॅकेज असून कार्यकुशल उमेदवारांना अधिकचे वाढीव लाभ मिळतील. या मुलाखतीसाठी केवळ पुरुष पदवीधारकांनाच प्राधान्य राहील. उमेदवारांना संवाद कौशल्य असावे. उत्कृष्ठ संवाद कौशल्य असलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल. उमेदवार १८ ते ३५ वयोगटातील असावा. उमेदवारांना सर्टिफाईड इंटरनेट कंसलटंट म्हणून किंवा फिल्डसेल्स जॉब करावा लागेल. निवडलेल्या उमेदवारांना ग्रॅच्युइटी, मेडिकल इन्शुरन्स, ॲक्सीडेंट इन्शुरन्स इ. कर्मचाऱ्यांना लागू असणारे सर्व फायदे मिळतील.

तरी जिल्ह्यातील इच्छुक व गरजू पात्र पुरुष उमेदवारांनी मंगळवार दि. २७ जून, २०२३ रोजी सकाळी १०.०० पासून सुरु होणाऱ्या कॅम्पस मुलाखतीचा लाभ घेऊन आपलीच निवड व्हावी यासाठी मुलाखतींची तयारी करुन पद्मश्री बाबासाहेब वेंगुर्लेकर महाविद्यालय पणदूरतिठा येथे उपस्थित राहून संधीचे सोने करावे असे आवाहन संस्थेचे कार्याध्यक्ष मा. शशिकांत अणावकरसर व सचिव डॉ. अरुण गोडकर, प्राचार्य डॉ. संभाजी शिंदे यांनी केले आहे.

**Interview Process:**

1) Prereplacement Talk
2) Online Test (Mobile)
3) Manager Interview
4) Documentation
5) Offer Letter Release
6) Training and Joining (within 2-4 days)

नांवनोंदणीसाठी खालील दिलेल्या लिंकवर क्लिक करा. सदर लिंक महाविद्यालयाच्या www.pbvm.co.in या वेबसाईट वरसुद्धा उपलब्ध आहे.

**(खालील लिंक रविवार दि. २५ जून, २०२३, पर्यंतच चालू राहील.):-**

**येथे क्लिक करा - मुलाखत नावनोंदणी २०२३-२४-Just Dial**

**अधिक माहितीसाठी ९१५८९७१६८७ / ७८८७४८८६६९ या क्रमांकावर संपर्क करावा.**